लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांचे मोठे विजय

## टी-२० स्पर्धा : पुणे, नागपूरची आगेकूच

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांनी विजय मिळविले. पुणे आणि नागपूर संघांनीही आपली आगेकूच कायम राखली.

सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठ संघाने सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठावर आठ गडी राखून विजय मिळविला. सोलापूर संघाने ८ बाद १०५ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाने ११.३ षटकांत २ बाद ११० धावा करून सामना जिंकला. शिवाजी विद्यापीठाचे अजय आयरेकर सामनावीर ठरले. दुसरा सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्यात झाला. हा सामना पुण्याने ८१ धावांनी जिंकला. मनीष गायकवाड यांना सामनावीर घोषित केले. दुपारच्या सत्रात नागपूरचे महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यातील सामना नागपूरने आठ गडी राखून जिंकला. नाशिकने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. त्यांनी २० षटकांत ५ बाद १२३ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल नाशिक संघाने १५.३ षटकांत २ बाद १२६ धावा केल्या. नागपूरच्या अजय गावंडेना सामनावीर घोषित करण्यात आले. अखेरच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ 'ब' संघाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचा ८१ धावांनी पराभव केला. 'ब' संघाने २९ षटकांत ७ बाद २३० धावांचा डोंगर रचला. प्रत्युत्तरादाखल नाशिक संघ २० षटकांत ६ बाद १४९ धावाच करू शकला. सामन्यात ३३ धावा व एक बळी घेणारा संतोष शिंदे सामनावीर ठरला.

लोकमत

# यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, पहिले मुख्यमंत्री व देशाचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांची जयंती रविवारी शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. भारती पाटील, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी, डॉ. संतोष सुतार, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. उमेश गडेकर, डॉ. कविता वड्राळे उपस्थित होते.

लोकमत

# तंत्रज्ञान अधिविभागात स्वसंरक्षण प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : स्वतःवर हल्ला झाल्यास हल्लेखोरांना ठोसे कसे आणि कोठे मारायचे, समोरून, बाजूने, पाठीमागून हल्ला झाल्यावर स्वतःचे संरक्षण कसे करायचे, याचे प्रशिक्षण शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थिनींना देण्यात आले. आर्मेचर बॉक्सिंग सेंटरचे सचिव ग्रॅण्डमास्टर संदीप कृष्णा पाटील, प्रशिक्षिका गायत्री लिमकर, रसिका कांबळे आणि टीमने स्व-संरक्षणाचे प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण केले.

तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस.एन. सपली यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच स्व-संरक्षणाचे धडे अवगत करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. महिला सक्षमीकरण कक्षाच्या अध्यक्ष सहाय्यक प्रा. डॉ. पी. पी. फडणीस यांनी स्वागत केले.

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाचे ५.३० कोटी तुटीचे अंदाजपत्रक मंजूर

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे सन २०२३-२४ सालचे ५३८.९९ कोटी अपेक्षित जमा व ५३८.२९ कोटी अपेक्षित खर्च असलेले आणि ५.३० कोटी इतके तूट असलेले अंदाजपत्रक शुक्रवारी मंजूर करण्यात आले. विद्यापीठ निधीतील शिलकीतून तुट भरून काढण्यात येणार आहे.

प्रशासकीय विभागांकडून ३७.१४ कोटी रु., शास्त्र अधिविभागांकडून ४.८५ कोटी, इतर अधिविभागांकडून २.४७ कोटी जमा होण्याची अपेक्षा आहे. इतर उपक्रमांमधून २५.२८ कोटी असे ६९.७४ कोटी स्वनिधीत जमा अपेक्षित आहे.

वेतन अनुदानापोटी शासनाकडून १२५.३० कोटी, वेगवेगळ्या संस्थांकडून प्रकल्पांसाठी १८.३७ कोटी जमा अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून ३२.१० कोटी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून १२ कोटी रक्कम जमेकरिता प्रस्तावित केलेली आहे. निलंबन लेख्यांमधून २७५.४७ कोटी असे ५३२.९९ कोटी जमा होणे अपेक्षित आहे.

खर्चाकरिता प्रशासकीय विभाग ५८.४० कोटी, शास्त्र अधिविभाग ७.५० कोटी, इतर अधिविभाग ६.२६ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रम ४७.७३ कोटी असा स्वनिधीमधील १२० कोटी खर्च अपेक्षित आहे. वेतन अनुदान खर्च १३२ कोटी, विविध वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्चासाठी ६.१३ कोटी, संशोधन व विकास निधी ३२ कोटी व घसारा निधी १२ कोटी, निलंबन लेखे २३६ कोटी अशी एकूण ५३८.२९ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्र व इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ व १६ मार्च रोजी राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेचे उद्घाटन शाहू महाराज यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर बीजभाषण करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. परिषदेत डॉ. यशवंतराव थोरात, डॉ. सदानंद मोरे, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. तारा भवाळकर, लक्ष्मीकांत देशमुख, प्राचार्य आनंद मेणसे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. शाहूप्रेमींनी परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन शाहू संशोधन केंद्राचे समन्वयक, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर २५९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर २५९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू असून सध्या विविध अभ्यासक्रमांचे निकाल परीक्षा विभागाकडून जाहीर केले जात आहेत. यात एम.कॉम., बी.व्होक., बीएसडब्ल्यू.,हॉर्ट्रीकल्चर सायन्स अँड टेक्नॉलाजी, मास्टर ऑफ व्हॅल्युएशन रियल इस्टेट आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. दरम्यान, मंगळवारी (दि.१४) मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, बी.टेक., बी. आर्किटेक्चर, मास्टर ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स, एमएस्सी. (टेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमाच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागात सुरळीतपणे पार पडल्या आहेत. परीक्षांसाठी २ हजार १२ विद्यार्थी उपस्थित होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
15 MAR 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणसांच्या मनाशी भिडणारे खरे साहित्य

## डॉ. व्ही. एन. शिंदे; विवेकानंद कॉलेजमध्ये युवा साहित्य संमेलन

**कोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा**

जगण्यासाठी कला महत्त्वाची असते. पुस्तकांबरोबर आपला सभोवताल वाचायला, वेचायला, बुद्धीत साठवायला आणि आठवून विचार करायला शिकल्यास सर्जनशीलता वृद्धिंगत होते. जे साहित्य कुटुंबाशी, समाज व माणसाच्या मनाशी भिडते ते खरे साहित्य होय. प्रत्येकाने सतत जागृत राहून लिहीत राहायला हवे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील वाङ्.मय मंडळ आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील साहित्य लेखनाची प्रेरणा रुजवण्याचे काम होत आहे, असे मत व्यक्त केले. यावेळी आय.क्यू.ए.सी.च्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी उपस्थित होत्या. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष बसेरा जमादारने स्वागत केले.

पहिल्या सत्रात साहित्यिक सोनाली नवांगुळ व द. तु. पाटील यांची मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. दुसऱ्या सत्रात कथाकथनकार हिम्मत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन कार्यक्रम झाला. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसरातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. प्रास्ताविक प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले.

पाहुण्यांची ओळख डॉ. प्रदीप पाटील यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील, समीक्षा फराकटे, भाग्यश्री वाघमारे यांनी केले. डॉ. संजय अंकुशराव यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# विद्यापीठाचे दोन्ही संघ विजयी

## कुलगुरू चषक स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

येथील शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेमध्ये मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांनी विजयी कामगिरी नोंदवून प्रतिस्पर्धी संघांवर मोठे विजय मिळविले. पुणे आणि नागपूर संघांनीही आगेकूच कायम राखली. सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठ संघाचा सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या संघाशी सामना झाला. हा सामना शिवाजी विद्यापीठाने आठ गडी राखून जिंकला.

सोलापूर संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. त्यांनी २० षटकात ८ बाद १०५ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाचे अजय आयरेकर सामनावीर ठरले. दुसरा सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्यात झाला. हा सामना पुण्याने ८१ धावांनी जिंकला. पुण्याच्या सुनील माने व बसवंत गजलवार यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. मनीष गायकवाड यांना सामनावीर घोषित करण्यात आले.

दुपारच्या सत्रात नागपूरचे महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यात सामना झाला. नागपूरने हा सामना आठ गडी राखून जिंकला. नाबाद ३८ धावांसह एक बळीही मिळविणाऱ्या नागपूरच्या अजय गावंडेला सामनावीर घोषित करण्यात आले.

दिवसातला अखेरचा सामना शिवाजी विद्यापीठाचा ब संघ आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यात झाला. हा सामना शिवाजी विद्यापीठ ब संघाने ८१ धावांनी जिंकला. सामन्यात ३३ धावा व एक बळी घेणारा संतोष शिंदे सामनावीर ठरला.

15 MAR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवी, स्वच्छ हवा!



## भोवताल



डॉ. व्ही.एन. शिंदे

अन्न, पाणी आणि हवा मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. या गरजा भागवण्यासाठी निसर्गच मदतीला येतो. मात्र, निसर्गाकडून हे घटक घेताना आपण निसर्गाला परत काय देतो, याचा विचार करण्याची गरज आहे. भारतातच नव्हे, तर जगातील बहुतांश देशांना या तिनही घटकांच्या पुरेशा आणि चांगल्या उपलब्धतेच्या चिंतेने ग्रासले आहे. हवा दिसत नाही, मात्र ती जाणवते. हवा आणि त्यातही हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण कमी असेल तर गुदमरते. सर्वसामान्य मानवाला हवेचा दर्जा पाहून ठरवता येत नाही. त्याचा थेट अनुभवच मिळतो. त्यामुळेच हवेचे प्रदूषण हा गांभीर्याने घेण्याचा विषय आहे. मात्र, दुर्दैवाने तसे होत नाही.

दरवर्षी पावसाळा संपला की भारतात हवेच्या दर्जाबाबत चर्चा सुरू होते. खरीपाची पिकें निघालेली असतात. शेतातील हिरवाई कमी झालेली असते. गवत वाळते किंवा त्याचाही हिरवा रंग गेलेला असतो. दरवर्षी हमखास नोव्हेंबरमध्ये दिल्लीत हवेचा दर्जा घसरतो. याबाबत ओरड व्हायची. हळूहळू इतर शहरातील हवेच्या गुणवत्तेबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. जगभरातील विविध शहरात हवा प्रदूषणाने चांगलाच विळखा घालायला सुरुवात केली आहे. त्यातच 'इंटरगव्हर्मेंटल पॅनेल फॉर क्लायमेट चेंज'चे अहवाल धक्कादायक धोक्याचे इशारे देत आहे. याच पार्श्वभूमीवर हा विषय आला.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाच्या अखत्यारीतील केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर असलेल्या मानकांनुसार हवेचा दर्जा गुणांक (एअर क्वालिटी इंडेक्स अर्थात एक्यूआय) आणि त्याचे शरीरावर होणारे परिणाम पाहिले की याचे गांभीर्य लक्षात येते. हा गुणांक ० ते ५० असेल तर ती हवा चांगली असते. अशा हवेचे मानवी शरीरावर कमीत कमी अनिष्ट परिणाम होतात किंवा होत नाहीत. ५१ ते १०० पर्यंत गुणांक असल्यास हवा समाधानकारक मानली जाते. अशा हवेत श्वसनाचे किरकोळ त्रास उद्भवू शकतात. विशेषतः दम्याच्या रूग्णांना उंचीवरील मजल्यावर रहावे लागत असल्यास ते जाणवतात. हवेचा गुणांक १०१ ते २०० असल्यास, ती हवा मध्यम दर्जाची मानतात. अशा हवेत श्वसन, दमा, हृदयरोग रूग्णांना, श्वसन सुरळीत न होऊन अस्वस्थता निर्माण होण्याची शक्यता जास्त असते. हाच गुणांक २०१ ते ३०० च्या दरम्यान असल्यास हवा खराब मानली जाते. या हवेमध्ये जास्त काळ राहिल्यास निरोगी माणसालाही श्वसनाचा त्रास सुरू होतो. ३०१ ते ४०० गुणांक असणारी हवा आणखी खराब मानली जाते. अशा हवेमध्ये श्वसनाचे दीर्घकालिक त्रास उद्भवण्याची शक्यता असते. ४०१ ते ५०० गुणांक असणारी हवा अतिशय खराब असते. या हवेमध्ये निरोगी माणसे आजारी पडतात आणि आजारग्रस्त लोकांचा मृत्यू संभवतो; तर त्यापेक्षा जास्त गुणांक असल्यास ती हवा मानवी वस्तीसाठी अयोग्य मानली जाते.

जगातील शहरांचा विचार केला तर हा लेख लिहित असताना चीनमधील शेन्मू गावातील गुणांक सर्वाधिक ७३० आहे. त्याबरोबर इतर चार शहरे फुयांग, बातोव, युलिन्शी व शुओझोव आहेत. या सर्व शहरांचा गुणांक ६०० पेक्षा जास्त आहे. त्यानंतर भारतातील दिल्लीजवळच्या रतलामपूरचा क्रमांक लागतो. या शहरातील हवेचा गुणांक हा ५६३ आहे. ४०० पेक्षा जास्त गुणांक असणारी जगात एकूण चौदा गावे किंवा शहरे आहेत, त्यातील तीन भारतातील आणि ११ चीनमधील आहेत. तीनशे ते चारशेच्या टप्प्यात हवेचा गुणांक असलेली २१ शहरे आहेत. त्यातील १३ शहरे चीनमधील आहेत. इतर शहरात फ्रान्समधील कॅमबेरी, थायलंडमधील नान व बन-मयी-खा-तायी, लाओसमधील झयांगबोली, पक्षान, लाउंगफान आणि झांग्जीकाउ, मंगोलियातील झुनहारा या शहरांचा समावेश होतो.

एकूणच काय, जागतिक पातळीवर हवा प्रदूषणात महासत्ता बनल्याच्या अविर्भावात मिरवणाऱ्या चीनने आघाडी घेतली आहे. याचे कारण म्हणजे प्रत्येक राष्ट्राला, राष्ट्रातील बहुतांश नागरिकांना स्वार्थाने पछाडलेले आहे. प्रत्येक राष्ट्र दरडोई सकल उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. ज्यांचे आज दरडोई उत्पन्न चांगले आहे ते आणखी जास्त करण्याच्या म्हणजेच श्रीमंत होण्याच्या मागे धावत आहेत. ते दरडोई उत्पन्न किती करायचे, माहीत नाही. कारण जास्त हा शब्द सापेक्ष असतो. दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी उत्पादन जास्त करायला हवे. उत्पादन वाढवायचे तर जास्त ऊर्जा मिळवायला हवी. ऊर्जा जास्त मिळवण्यासाठी संसाधने हवीत. त्यातही उत्पादनापासून जास्त नफा हवा असेल, तर खर्च कमी करायला हवा आणि खर्च कमी करायचा तर कमी खर्चाचे इंधन वापरून, पुरेशी ऊर्जा मिळायला हवी. म्हणूनच राष्ट्राच्या प्रगतीचा मापदंड म्हणून दरडोई ऊर्जेचा वापर पाहिला जातो.

ऊर्जा कमी खर्चात मिळवण्यासाठी लाकूड, दगडी कोळसा, खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. यासाठी जंगलांची कत्तल होते. दगडी कोळसा, खनिज तेल आणि वायूचा मोठ्या प्रमाणात उपसा करण्यात येतो. यांच्या ज्वलनातून ऊर्जा मिळवतात. वाहने, कारखाने ते घरगुती वापर सर्वत्र यांच्या ज्वलनातून ऊर्जा मिळवली जाते. या संसाधनांना ऊर्जा मिळवण्यासाठी जाळत असताना हवेत पूर्ण ज्वलन झाल्यास कार्बन डाय ऑक्साईड जातो. खनिज तेल आणि दगडी कोळशामध्ये इतरही घटक असतात. सल्फरसारख्या पदार्थांचे अर्धवट ज्वलन होते आणि सल्फर डाय ऑक्साईडसारखे वायूही वातावरणात मिसळतात. दगडी कोळशामध्ये पारा, शिसे, सल्फर डाय ऑक्साईड, नायट्रोजन डाय ऑक्सईड, जड धातू आणि इतरही घटक असतात, ते सर्व वातावरणात मिसळतात.

खनिज तेलातून अनेक घटक काढून टाकण्याची प्रक्रिया करण्यात येते. त्याहीपेक्षा नैसर्गिक वायू आणखी कमी प्रदूषके वातावरणात सोडतो. मात्र, मूळ कार्बन डाय ऑक्साईड प्रत्येक इंधनाच्या ज्वलनातून बाहेर पडतोच. कारखान्यांच्या संख्येतील वाढ, घरगुती ऊर्जा वापरातील वाढ आणि वाहनांच्या संख्येतील वाढ यामुळे इंधनाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण भयानक वेगाने वाढत आहे. सर्व प्राण्यांच्या श्वसनातून कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढत जाते. वातावरणात मिसळणाऱ्या या प्रदूषकांमुळे ऑक्सिजनचे प्रमाण घटते. यामुळे हवा श्वसनास अयोग्य बनते. शेतकरीदेखील शेतातील पिकांचा वापरायोग्य नसलेला भाग उचलून त्याचे खत न बनवता थेट शेतातच जाळतात. काही प्रमाणात हवा प्रदूषणास हा घटकही कारणीभूत ठरतो.

निसर्ग, निसर्गातील हिरव्या वनस्पती कार्बन डाय ऑक्साईडचे परत ऑक्सिजनमध्ये रूपांतर करतात. या झाडांची संख्या घटवून आपण जणूकाही निसर्गाला घातक रिटर्न गिफ्ट देत आहोत. यातून पर्यावरणाचे नाही, तर मानवाचे आणि समस्त जीवसृष्टीचे नुकसान करत आहोत. म्हणून ऊर्जेचा वापर कमीत कमी करायला हवा!

संपर्क : ९६७३७८४४००
vilasshindevs44@gmail

15 MAR 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी सोलापूर विद्यापीठाविरुद्धच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाचे अनिल पाटील यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले.

# शिवाजी विद्यापीठ, पुणे, नागपूर विद्यापीठाची आगेकूच

कोल्हापूर, ता. १४ : राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेमध्ये आज शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांनी विजयी कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघांवर मोठे विजय मिळविले. पुणे आणि नागपूर संघांनी आगेकूच कायम राखली.

सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठाने सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठावर आठ गडी राखून विजय मिळविला. सोलापूर विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ८ बाद १०५ धावा केल्या. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाने फलंदाजी करताना ११.२ षटकांत २ बाद ११० धावा करून सामना जिंकला. शिवाजी विद्यापीठाचे अजय आयरेकर सामनावीर ठरले. दुसऱ्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठावर ८१ धावांनी मात केली. प्रथम फलंदाजी करताना पुण्याने २० षटकांत ८ बाद १८९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल लोणेरे संघ २० षटकांत ९ बाद १०८ धावा करू शकला. मनीष गायकवाड यांना 'सामनावीर' घोषित करण्यात आले. दुपारच्या सत्रात नागपूरच्या महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाने नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठावर आठ गडी राखून विजय मिळविला. नाबाद ३८ धावांसह एक बळीही मिळविणाऱ्या नागपूरच्या अजय गावंडे यांना 'सामनावीर' घोषित करण्यात आले.

## कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

### विद्यापीठाच्या 'ब' संघाचा विजय

■ दिवसातला अखेरचा सामना शिवाजी विद्यापीठाचा 'ब' संघ आणि नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्यात झाला. हा सामना शिवाजी विद्यापीठ 'ब' संघाने ८१ धावांनी जिंकला. या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली आणि २० षटकांत ७ बाद २३० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल नाशिक संघ २० षटकांत ६ बाद १४९ धावाच करू शकला. सामन्यात ३३ धावा आणि एक बळी घेणारा संतोष शिंदे 'सामनावीर' ठरला.

15 MAR 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ संघांचा मोठा विजय

## राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा : फुले व मत्स्यविज्ञान विद्यापीठाचीही आगेकूच

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील मैदानात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेअंतर्गत मंगळवारी झालेल्या साखळी सामन्यांमध्ये शिवाजी विद्यापीठ 'अ' व 'ब' संघांनी विजय मिळवला. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पुणे) व महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ (नागपूर) या संघांनीही आपल्या प्रतिस्पर्धींना हरवून आगेकूच कायम ठेवली. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, सकाळी शिवाजी विद्यापीठ 'अ' संघ व सोलापूरचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ यांच्यात पहिला सामना झाला. हा सामना शिवाजी विद्यापीठाने आठ गडी राखून जिंकला. सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना होळकर विद्यापीठाने २० षटकात ८ बाद १०५ धावाच केल्या. प्रत्युत्तरादाखल खेळलेल्या शिवाजी विद्यापीठाने ११.२ षटकात २ बाद ११० धाव ठोकत सामना जिंकला. विद्यापीठाच्या संघाला सामना जिंकून देण्यासाठी अनिल पाटील यांनी नाबाद ४५ व विक्रम कोंडावळे यांनी ३३ धावांची झुंजार खेळी केली. गोलंदाजी ३ बळी घेतलेले अजय आयरेकर यांना सामनावीर म्हणून गौरवले.



**कोल्हापूर : राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यातील एक क्षण.**

दुसऱ्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठावर ८१ धावांनी विजय मिळवला. या सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना फुले विद्यापीठाने २० षटकात ८ बाद १८९ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरादाखल खेळलेला आंबेडकर विद्यापीठ संघ मात्र २० षटकात ९ बाद १०८ धावांवर गुंडाळला गेला. फुले विद्यापीठाला सामना जिंकून देण्यासाठी ८० धावा ठोकणारे मनिष गायकवाड यांना सामनावीर म्हणून सन्मानित केले.

नागपूरचे महाराष्ट्र पशू मत्स्यविज्ञान विद्यापीठ आणि नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्यात तिसरा सामना झाला. सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना मत्स्यविज्ञान विद्यापीठाने २० षटकात ५ बाद १२३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना विज्ञान विद्यापीठाने १५.२ षटकात २ बाद १२६ धावा केल्या. त्यामुळे विज्ञान विद्यापीठाचा मत्स्यविज्ञान विद्यापीठाचा ८ गडी राखून विजय मिळवला. मत्स्यविज्ञान विद्यापीठाचे अजय गावडे यांना सामनावीर म्हणून गौरवले.

चौथ्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ ब संघाने नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठला ८१ धावांनी पराभूत केले. शिवाजी विद्यापीठ संघाने २० षटकात ७ बाद २३० धावांचा डोंगर उभारला. यामध्ये अभिजीत कोठावळे यांनी ५३, दीपक कांबळे यांनी ३८, संतोष शिंदे यांनी ३३ व शशिकांत दाभाडे यांनी २५ धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरादाखल खेळलेल्या चव्हाण मुक्त विद्यापीठाला शिवाजी विद्यापीठ संघाने २० षटकात ६ बाद १४९ धावांरच रोखत सामन्यात विजय मिळवला. गोलंदाजी करताना राजू मुपडे, अनिल साळोखे, शशिकांत दाभाडे, संतोष खाडे, संतोष शिंदे यांनी प्रत्येकी एक बळी घेत शिवाजी विद्यापीठ संघाला सामना जिंकून दिला. फलंदाजीसह गोलंदाजीतही उठावदार कामगिरी केलेले संतोष शिंदे यांना सामनावीर सन्मानित केले..

तरूण भारत

# राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषद आजपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभाग आणि शाहू संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. १५ आणि गुरूवारी १६ रोजी राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परीषद आयोजित केली आहे. विद्यापीठातील मानव्यशास्त्र हॉलमध्ये परिषदेचे बुधवारी सकाळी साडेदहा वाजता श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन होणार आहे. डॉ. भालचंद्र मुणगेकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष डॉ. जयसिंगराव पवार आणि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

मानव्यशास्त्र हॉलमध्ये परिषदेत बुधवारी दुपारी राजर्षी शाहू आणि युरोपीयन विचार विश्व यावर डॉ. यशवंतराव थोरात मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी ३ वाजता राजर्षी शाहू आणि त्यांची स्त्रीविषयक भविष्यवेधी दृष्टी यावर डॉ. तारा भवाळकर तर डॉ. अशोक चौसाळकर हे राजर्षी शाहू आणि ब्राह्मणेत्तर चळवळ यावर व्याख्यान देणार आहेत. गुरूवारी सकाळी साडेअकरा वाजता राजर्षी शाहू आणि महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा यावर डॉ. सदानंद मोरे तर राजर्षी शाहू आणि सामाजिक न्याय यावर प्राचार्य आनंद मेणसे यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी ३ वाजता निवृत्त जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख हे राजर्षी शाहू आणि भारतीय संविधान यावर मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी शाहू संशोधन केंद्राचे संचालक जयसिंगराव पवार आहेत. या कार्यक्रमाद्वारे परिषेदेची सांगता होणार आहे.